


# पारनेर दर्शन




वर्ष ३ अंक ८, मंगळवार १९ नोव्हेंबर २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# विविध योजनांचा लाभ देऊन दातेंसाठी आशीर्वाद मागतोय!

## ■ कृषि मंत्री धनंजय मुंडे यांची साद ■ निघोज येथे काशिनाथ दाते यांच्या प्रचारार्थ सभा ■ सुधामती कवादांचा राष्ट्रवादीत प्रवेश



■ महायुतीचे उमेदवार काशिनाथ दाते यांच्या प्रचारार्थ कृषि मंत्री धनंजय मुंडे यांची निघोज येथे सभा पार पडली. (छाया : जयसिंह हरेल,निघोज)

निघोज : प्रतिनिधी

**राज्य शासनाच्या विविध योजनांचा लाभ आम्ही लाडकी बहिण, शेतकरी, बेरोजगारांना दिला असून या निवडणूकीच्या निमित्ताने महायुतीचे उमेदवार काशिनाथ दाते यांच्यासाठी मी आशवाद मागण्यासाठी आलो असल्याची साद राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी घातली. दरम्यान या सभेमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या निघोज ग्रामपंचायतीच्या सदस्या सुधामती कवाद यांनी यावेळी मुंडे यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटामध्ये प्रवेश केला.**

महायुतीचे उमेदवार काशिनाथ दाते यांच्या प्रचारार्थ निघोज येथे मंत्री धनंजय मुंडे यांच्या जाहिर सभेचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. ज्येष्ठ नेते प्रभाकर कवाद हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.

यावेळी राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष अशोक सावंत, भाजपाच्या राज्य कार्यकारणीचे सदस्य विश्वनाथ कोरडे, तालुकाध्यक्ष राहुल शिंदे, वसंत चेडे, डॉ. भाऊसाहेब खिलारी, जि प चे माजी सदस्य मधुकर उचाळे, मा.सभापती गणेश शेळके, जि.प.चे मा सदस्य राजाराम एरंडे, सचिन वराळ, ॲड. बाळासाहेब लामखडे, रोहिदास लामखडे, पंकज कारखिले, भास्कर उचाळे, गणपतराव नरसाळे, चित्रा वराळ, ज्ञानेश्वर वरखडे, सुनील थोरात, रखमाजी कापसे, राजेंद्र करंदीकर, भाजपाच्या महिला आघाडीच्या तालुकाध्यक्ष सोनाली सालके, उमेश सोनवणे, सुधामती कवाद, धनंजय गाडेकर, विठ्ठल कवाद, निवृत्ती वरखडे, हिरामण सोनवणे, मनोहर राउत, विलास हारदे, अमोल सालके, राजेश गोपाळे, सुमन कवाद, बॉबी गायखे, सुनंदा जाधव, भाजपच्या महिला आघाडीच्या तालुका उपाध्यक्ष सोनाली सालके, माजी उपसरपंच उमेश सोनवणे, सुधामती कवाद, धनंजय गाडेकर, विठ्ठलराव कवाद , राष्ट्रवादी काँग्रेसचे विद्यार्थी संघटनेचे तालुकाध्यक्ष निवृत्ती वरखडे, हिरामण सोनवणे, पारनेर तालुका ओबीसी सेलचे तालुकाध्यक्ष मनोहर राऊत, सांस्कृतिक सेलचे तालुकाध्यक्ष विलासराव हारदे, अमोल सालके, राजेश गोपाळे, सुमन कवाद, बॉबी गायखे, सुनंदा जाधव, आदी यावेळी उपस्थित होते.

### त्यांचे पोट दुखायला लागले !

विकासाच्या गप्पा मारायचा विषय नाही. महायुती सरकारचा अर्थसंकल्प अजित पवार यांनी मांडला. तो महाराष्ट्राच्या साडेबारा कोटी जनतेसाठी होता. त्यात महत्वाकांक्षी योजना म्हणजे महाराष्ट्रातील सर्व बहिणींना लाडके करण्याची योजना होती .या योजनेनंतर महाविकास आघाडीचे नेते तुटून पडले. सरकार पैसे देऊ शकत नाही तिजोरीत पैसे नाहीत अशी टीका सुरू झाली. पंधराशे रूपयांचा हप्ता गेल्यानंतर तोंड बंद होतील असे वाटले होते. मात्र टीका सुरूच राहीली. ते आमच्या लाडक्या बहिणीचा संभ्रम करत होते. तीन महिन्याचे पैसे थेट खात्यावर टाकले गेले. त्यानंतर मात्र टीका बंद केली. योजनेमुळे यांच्या पोट दुखायला लागले. ही योजना बंद व्हावी यासाठी महाविकास आघाडीचे नेते न्यायालयायात गेले. त्यांच्या मनात पाप येत असतील तर आपल्या पायातलं काढून त्यांना दाखविण्याची हिंमत दाखवावी.

धनंजय मुंडे
कृषि मंत्री

### पारनेरकरांशी नाते

पारनेरचा कारखाना मुंडे साहेब व माझे वडील अण्णांनी चालवायला घेतला. ऊस उत्पादक शेतकऱ्यांना त्यांनी न्याय देण्याचा प्रयत्न केला. पारनेरकर महाराजांच्या एक भक्त म्हणून माझी पारनेरकरांशी नाते असल्याचे मंत्री धनंजय मुंडे म्हणाले.

### शेतीला मोफत वीज

केंद्र सरकाने पीएम किसान योजनेतून सहा हजार त्यासोबत राज्य सरकारकडून सहा हजार रूपये देण्यात येत आहेत. हा भाग कांदा उस उत्पादकांचा आहे. लोकसभेला कांदा उत्पादक नाराज होते. आम्ही कांद्यावरील निर्यात बंदी उठविली असून कांद्याला चांगले भाव आहेत. भविष्यात भाव उतरणार नाहीत याची खबरदारी आम्ही घेऊ. शेतकऱ्यांच्या आंदोलनात एकच मागणी असे. शेतीसाठी मोफत वीज दिली पाहिजे. त्याची दखल घेत. अजित पवार यांनी मोफत वीज योजना सुरू केली. महायुतीने वचन दिले असून साडेबारा अश्वशक्तीपर्यंत मोफत वीज मिळणार असल्याचे मुंडे म्हणाले.

### पारनेर तालुक्याता १२१ कोटी

महायुतीचे सरकार हे शेतकऱ्यांचे आहे. सर्वाधिक जेवढे काय देता येईल तेवढे दिले आहे. त्यांना अधिक काही द्यावे लागेल. कोणतेही संकट आले तर त्यात शेतकऱ्याची जात सापडते. एक रूपयात पिक विमा देणारी योजना महाराष्ट्रात राबविली. हे एकमेव राज्य आहे. या तालुक्यात १२१ कोटी रूपये मिळाले आहेत. महायुतीने शेतकऱ्यालाही लाडके केल्याचे मुंडे म्हणाले.

### त्यांच्याकडून फसवणूक

विविध योजनांचा लाभ देऊन काशिनाथ दाते यांच्यासाठी आशीर्वाद मागण्यासाठी आलो आहोत. आम्ही दिड हजार दिल्यानंतर त्यांनी तीन हजार रूपये देण्याची घोषणा त्यांनी केली. हिमाचलच्या जाहिरनाम्यात त्यांनी ही योजना दिली होती. साडेतीन वर्षे झाले ही योजना आजूनही लागू नाही. कर्नाटकातही आश्वासन देण्यात आले मात्र तिथेही एक रूपया मिळाला नाही. तेलंगणाच्या निवडणूकीत हीच योजनेची घोषणा केली तिच्यातही फसवणूक केली गेल्याचे मुंडे म्हणाले.

### सुप्त लाट

या मतदारसंघात आम्ही परिवर्तनाची लढाई सुरू केली आहे. फुले,शाहू, आंबेडकरांच्या विचारांवर चालणारा हा तालुका आहे. गेल्या पाच वर्षात तालुक्याची राजकीय संस्कृती बिघडविण्याचे काम झाले. हे बदलण्यासाठी संपूर्ण मतदारसंघातील ज्येष्ठ, तरूण पेटून उठला आहे. तालुक्यात सुप्त लाट आहे. अनेकांवर दबाव आहे. मात्र ते आपल्यासोबत असल्याचे दाते म्हणाले.

### मताधिक्क्याने विजयी होऊ

निघोज व परिसरातील सर्व मतदार राष्ट्रवादी काँग्रेसच्या पाठीशी उभे राहतील. विजय औटी यांनी मोठे मन दाखविले. कशाचीही अपेक्षा न ठेवता त्यांनी पाठींबा दिला. त्यांच्या कार्यकर्त्यांना ताकद देणार आहोत. औटी यांच्या निर्णयामुळे आपण मताधिक्क्याने विजयी होऊ. सुधामती कवाद यांनी पाठींबा दिला. त्या उच्चशिक्षित असून त्यांचे संघटन मोठे आहे. त्यांना विविध संधी दिल्या जातील. कै. बाबासाहेब कवाद यांनी सातत्याने मी विधानसभा निवडणूक लढवावी ही त्यांची भावना होती. आज ते हयात नाहीत, माझ्या उमेदवारीचा त्यांना आनंद झाला असता. पतसंस्था चळवळ अडचणीत आहे. अनेक ठेवीदार अडचणीत आहेत ठेवीदारांची संघटना असून राष्ट्रवादी संघटनेला आपल्याकडून अपेक्षा आहे. त्यांनीही आपणास पाठींबा दिला आहे.

काशिनाथ दाते
महायुतीचे उमेदवार

### घडयाळाला डायमंड बसविला !

मी पूर्वीपासून राष्ट्रवादीतच होतो. सर्वेक्षणात मी पुढे असताना काही तांत्रीक अडचणींमुळे मला उमेदवारी मिळू शकली नाही. लोकसभा निवडणूकीनंतर आमच्यावर अन्याय सुरू करण्यात आला. या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी आम्ही एकत्रीतपणे विधानसभेचे रणशिंग फुंकले होते. आम्ही स्वतंत्र लढलो असतो तर दोघांनाही पराभवाला सामोरे जावे लागले. रविवारी आम्ही घडयाळात डायमंड बसविला आहे. त्या डायमंड वॉचची काय किंमत आहे हे आम्ही दाखवून देऊ. माझ्या सहकाऱ्यांना तुम्ही वाळीत टाकू नका. त्यांना पाठबळ द्या.

विजय सदाशिव औटी
अपक्ष उमेदवार

### पक्षाने मला पाठबळ दिले पाहिजे

शासनाची लाडकी बहिण योजनेच्या लाभार्थी मोठया संख्येने तालुक्यात आहेत. दोन हजार अपंग लाभार्थी आहेत. मी प्रवेश केला माझ्या सोबत सगळे आले आहेत. मी प्रवेश केल्यानंतर मला हवे ते पाठबळ मला पक्षाने दिले पाहिजे. जी माणसे संकटात साथ देतात त्यांना साथ दिली पहिजे. या सर्वांचा विचार करून मी प्रवेश करण्याचा निर्णय घेतला आहे. निर्णय विचारपूर्वक घेतला आहे.

सुधामती कवाद
ग्रामपंचायत सदस्या, निघोज

### संदीप वराळांची आठवण

निघोज परिसरात स्व. संदीप वराळ हे हरहुन्नरी नेतृत्व होते. वराळ फाउंडेनशचा मोठा युवक वर्ग असून ते अतिशय चांगले काम करत आहेत. त्यांचेही आपणास पाठबळ आहे. त्यांचा आपल्या विजयात मोलाचा वाटा असेल. परिवर्तनाची ही लढाई आपणास जिंकायची आहे.

काशिनाथ दाते
महायुतीचे उमेदवार

### दाते सरांचे घडयाळ चमकणार !

सर्वांनी काशिनाथ दाते यांना सर्वांनी मदत करायची आहे. दाते यांना विजय औटी यांनी पाठींबा दिल्याने दाते सरांचे घडयाळ चमकणार आहे. कार्यकर्त्यांच्या आग्रहाखातर विजय औटी यांनी उमेदवारी केली.मात्र दोघांचा विरोधक एकच असल्याने त्यांना मत विभागणीचा फायदा होऊ नये म्हणून विजय औटी यांनी घेतलेला निर्णय कौतुकास्पद आहे. लोकसभा निवडणूकीत तुम्ही अभ्यासू खासदाराचा पराभव केला. ती चुक आता करू नका.

सचिन वराळ
अध्यक्ष, संदीप पाटील जनसेवा फाउंडेशन

### अंकशास्त्र, ज्योतिषाची गरज नाही !

संपूर्ण तालुक्यात परिवर्तनाचा लाट निर्माण झाली आहे. भाळवणी, निघोज, दैठणेगुंजाळ येथील सभांची गर्दी पाहीली तर ज्योतिषाची अथवा अंकशास्त्राची गरज राहीली नाही. जनतेने आता आकडेमोड केली आहे. महायुती सरकारने चांगले काम केले आहे. आपला उमेदवार निष्कलंक, कार्यकर्ते अत्यंत संयमी आहेत. पारनेरची जनता दुध का दुध, पाणी का पाणी करण्यात हुशार आहेत. लोकसभेला तुम्ही आमचे ऐकले नाही. तालुक्यातील जनतेने तालुक्यातील माणूस खासदार झाला पहिजे यासाठी मनाचा मोठेपणा दाखविला. त्यानंतर त्यांनी थांबले पाहिजे होते. जी जनता पुढे नेते तीच जनता मागे घेत असते. ज्या गोष्टींकडे लक्ष द्यायला पाहिजे होते त्याकडे गेल्या पाच वर्षात लक्ष दिले गेले नाही. या सगळ्या गोष्टी दुरूस्त करण्यासाठी तालुक्यात परितर्वन करायचे आहे.

विश्वनाथ कोरडे
भाजपा प्रदेश कार्यकारणी सदस्य

### दाते ५० ते ६० हजारांनी विजयी होतील

काशिनाथ दाते यांनी बाबासाहेब ठुबे यांच्यापासून विविध आमदारांसोबत काम केले आहे. तालुक्यातील घराघरात त्यांची ओळख आहे. त्यांचे काम उत्कृष्ट असून त्यांच्याकडून एकही व्यक्ति दुखावलेला नाही. राष्ट्रवादी काँग्रेसला भावलेला हा नेता आहे. काशिनाथ दाते हे ५० ते ६० हजार मतांनी विजयी होतील.

इंद्रभान गाडेकर,
पानोली

### बाजार समितीला उर्जितावस्था

काशिनाथ दाते यांनी जिल्हा परिषदेच्या माध्यामातून विविध विकास कामे माग लावली. बाजार समितीमध्ये नेतृत्व करताना त्यांनी उलाढाल वाढवून संस्थेला उर्जितावस्था आणली. दाते यांचा ४० वर्षांचा राजकीय अनुभव आहे. समोरच्या उमेदवाराचे तेवढे वय देखील नाही. नागरीकांनी भुलथापांना बळी न पडता काशिनाथ दाते यांना साथ द्या.

संग्राम पावडे, संचालक, खरेदी विक्री संघ

### दाते न्याय देतील

पाच वर्षात निष्ठावान कार्यकर्त्यांना डावलून स्वतःच्या संघटनेच्या कार्यकर्त्यांना पाठबळ दिले गेले. हा तालुका राष्ट्रवादीच्या विचारांना मानणारा आहे. पक्षाचा आमदार होऊनही आत्मसन्मान दिला गेला नाही. विविध निवडणूकांमध्ये डावलले गेले. या निवडणूकीत आपल्या विचारांचा उमेदवार आहे. त्यांनी गेली चाळीस वर्षे त्यांनी विविध प्रश्नांना न्याय दिला. तालुक्यातील सर्व कार्यकर्त्यांना काशिनाथ दाते हे न्याय देऊ शकतील. सद्सदविवेक बुध्दीने मतदान करा.

विक्रमसिंह कळमकर
तालुकाध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार

### दाते यांच्या पाठीशी ताकद उभी करा

मतदारसंघात भाजपाला उमेदवारी मिळेल अशी अपेक्षा होती. परंतू राधाकृष्ण विखे, डॉ. सुजय विखे यांनी ही जागा मनाचा मोठेपणा दाखवून राष्ट्रवादीला दिली. तालुक्यात परितर्वन होत आहे. विश्वनाथ कोरडे, राहुल शिंदे यांच्या माध्यमातून कोटयावधी रूपयांची विकास कामे तालुक्यात माग लागली आहेत. लोकसभेची हवा पुर्णपणे ओसरली आहे. गेली चाळीस वर्षे काशिनाथ दाते यांनी तालुक्यात भरीव काम केले असून त्यांच्या पाठीशी आपण ताकद उभी केली पाहिजे.

बाबासाहेब खिलारी
चेअरमन, खरेदी विक्री संघ

### दाते यांच्या उमेदवारीला प्रतिसाद

काशिनाथ दाते हे अभ्यासू व्यक्तिमत्व असून त्यांनी विकास कामांच्या माध्यमातून ठसा उमटविला आहे. विविध आमदारांसोबत त्यांनी काम केले असून त्यांच्या गाठीशी मोठा अनुभव आहे. त्यामुळेच त्यांच्या उमेदवारीला भरभरून प्रतिसाद मिळत आहे.

किसन शिंदे

### दाते यांना मनाचा ठाव घेता येतो

एक सक्षम उमेदवार म्हणून काशिनाथ दाते यांना उमेदवारी देण्यात आली आहे. प्रत्येक गावामध्ये त्यांचे काम आहे. मात्र त्यांना त्याची जाहिरात करता आली नाही. माणसाच्या मनाचा ठाव मात्र त्यांना घेता येतो. राज्यातील लाडक्या बहिणींचे भविष्य सुरक्षित केले आहे. बचत गटाच्या माध्यमातून बहिणींसाठी भरीव निधी महायुती सरकारने दिला आहे. तिर्थयात्रेला गेल्या म्हणून महिला सक्षम होणार नाहीत. महिलांच्या चेहऱ्यावर समाधान दिसत असून काशिनाथ दाते यांच्या प्रचाराचीही आता गरज उरलेली नाही. उमेदवार महिला आहे की पुरूष आहे हे न पाहता त्यांनी किती काम केले हे पाहिले पाहीजे.

सोनाली सालके
तालुकाध्यक्ष भाजपा महिला आघाडी

### टाकळी गट आघाडी देणार

आपण सुजय विखे यांना आघाडी देण्याचा शब्द दिला होता. मात्र तो आपण पुर्ण करू शकलो नाही. तालुका पाच वर्षे मागे गेला आहे. राज्यात महाविकास आघाडीचे सरकार असताना काय स्थिती होती ? महायुतीचे सरकार आल्यावर वीज तसेच इतर विविध कामे माग लागली आहेत. महायुतीला विजयी करण्यासाठी कोणत्याही अमिषाला बळी न पडण्याची खुणगाठ बांधा. तालुक्यात सुप्त लाट निर्माण झाली असून काशिनाथ दाते यांचा विजय निश्चित आहे. टाकळी ढोकेश्वर गटामध्ये दहा ते पंधरा हजार मतांची आघाडी देणार आहोत.

शिवाजी खिलारी
मा. सरपंच, टाकळी ढोकेश्वर

### उचाळे चमत्कार करणार !

बांधकाम समितीचे सभापती म्हणून काम करताना काशिनाथ दाते यांनी मिळालेल्या संधीचे सोने केले. या पदाच्या माध्यमातून त्यांनी पारनेर तालुक्याला मोठा निधी उपलब्ध करून दिला. निघोज गटामध्ये मधुकर उचाळे यांनी काशिनाथ दाते यांच्या प्रचाराची धुरा खांद्यावर घेतली असून ते या गटामध्ये चमत्कार करतील.

बाळासाहेब आवारी
मा. सरपंच, रांधे

### लाडक्या बहिणी सरांसोबत


तालुक्यात ६८ हजार लाडक्या बहिणींची प्रकरणे झाली असून या लाडक्या बहिणी काशिनाथ दाते यांच्या पाठीशी उभ्या राहणार आहेत.

सुनील थोरात
तालुकाध्यक्ष, लाडकी बहिण योजना

# चंदेरी

## कार्तिकने चुकून जाळले होते बहिणीचे केस!

चित्रपट, टीव्ही मालिका, नाटक अशा विविध माध्यमांतून मनोरंजन करणाऱ्या कलाकारांविषयी प्रेक्षकांना




उत्सुकता असते. त्यांच्या वैयक्तिक आयुष्यातील गोष्टी जाणून घेणे अनेकांना आवडते. आता अभिनेता कार्तिक आर्यनने लहान असताना काय केले, याची आठवण त्याच्या आईने सांगितली आहे.

कार्तिक आर्यनची आई माला तिवारी यांनी मुलाखतीत कार्तिकच्या बालपणीचे किस्से सांगितले आहेत. त्यांनी एक आठवण सांगत म्हटले, की कार्तिकला प्रत्येक गोष्टीबद्दल फार कुतूहल असायचे. एक दिवस त्याला एका डिओड्रंटच्या बाटलीवर ज्वलनशील चिन्ह दिसले. खरंच आग लागते का, हे त्याला बघायचे होते. त्याने त्याच्या बहिणीला मेणबत्ती लावायला सांगितले. त्यानंतर त्याने तो डिओड्रंट त्या मेणबत्तीवर फवारला. दुर्दैवाने त्याने तो डिओड्रंट मोठ्या प्रमाणात स्प्रे केला होता. त्यामुळे त्याच्या बहिणीच्या केसांना आग लागली. त्यांनी ती आग विझवली. मात्र कार्तिकला त्याच्या या प्रयोगासाठी मार बसला होता. कार्तिकने यावर बोलताना म्हटले, की मला तिचे केस जाळायचे नव्हते. ती चुकीच्या जागी बसली होती. जेव्हा मेणबत्तीवर मी डिओड्रंट स्प्रे केला तेव्हा तिच्या एका बाजूच्या केसांनी आग पकडली. मी लगेच त्यावर पाणी टाकायला सुरुवात केली. त्यानंतर माझी आई माझ्यावर खूप रागावली होती. दरम्यान, कार्तिक आर्यन नुकताच 'भूल भुलैय्या ३'मधून प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. त्यामध्ये माधुरी दीक्षित आणि विद्या बालन प्रमुख भूमिकांत आहेत.

## सामान्य कुटुंबातून आलेली रविना बनली सुपरस्टार

**१९९० च्या दशकात बऱ्याच अभिनेत्री सामान्य कुटुंबातून बॉलीवूडमध्ये आल्या. त्यांनी मेहनत आणि समर्पणामुळे इंडस्ट्रीत स्वतःची ओळख निर्माण केली. माधुरी दीक्षितसारख्या अभिनेत्रीचे नाव या यादीत सर्वांत वर आहे. मात्र, याच दशकात सामान्य कुटुंबातून वर येऊन माधुरी दीक्षितलाही टक्कर देणारी अभिनेत्री होती रवीना टंडन. तिचा पहिलाच सिनेमा फ्लॉप झाल्यानंतर तिने एकाच वर्षात आठ सुपरहिट सिनेमे दिले होते.**



अभिनेत्री रवीना टंडनने सलमान खानबरोबर बॉलीवूडमध्ये पदार्पण केले. पुढे तिने अक्षय कुमारबरोबर काही सिनेमे केले; पण तिची खरी जोडी गोविंदाबरोबर जमली. रवीनाने करिअरची सुरुवात १९९१ मध्ये सलमान खानबरोबर 'पत्थर के फूल' या चित्रपटातून केली. हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर अपयशी ठरला. अभिनेत्री होण्याआधी रवीना सामान्य मुलगी होती. तिच्या आयुष्यात भरपूर संघर्ष आणि मेहनत होती. एका मुलाखतीत रवीना म्हणाली, दहावीमध्ये असतानाच मी काम करायला सुरुवात केली. त्या वेळी मी स्टुडिओमधील मजला पुसायची. मी प्रल्हाद कक्कर यांची सहायक म्हणून काम करीत होते. अभिनय क्षेत्रात येण्याचा माझा कोणताही विचार नव्हता. १९९४ हे वर्ष रवीनासाठी सुवर्णकाळ ठरले. त्या वर्षी तिचे १० चित्रपट प्रदर्शित झाले. त्यापैकी आठ चित्रपट सुपरहिट ठरले. त्या वर्षी बॉक्स ऑफिसवर सर्वाधिक कमाई करणारे चार चित्रपट रवीनाचे होते. रवीनाने 'डर' या शाहरुख खानच्या सुपरहिट चित्रपटाला नकार दिला होता. त्यानंतर तिने शाहरुखबरोबर दोन चित्रपट केले; पण ते दोन्ही चित्रपट बॉक्स ऑफिसवर अपयशी ठरले. २००६ मध्ये रवीना टंडनने अभिनयातून ब्रेक घेतला. काही काळानंतर तिने ओटीटीवर दमदार कमबॅक केले. अक्षय कुमारबरोबर रवीना टंडनचे नाव अनेकदा जोडले गेले. रवीनाने २००४ मध्ये अनिल थडानी यांच्याशी लग्न केले.

## जुही चावला बॉलीवूडमधील सर्वांत श्रीमंत अभिनेत्री!

**अभिनेत्री जुही चावला तिच्या अभिनयासाठी, उत्तमोत्तम चित्रपटांसाठी ओळखली जाते. ८०-९०च्या दशकातील यशस्वी आणि लोकप्रिय अभिनेत्रींपैकी एक अशी जुही चावलाची ओळख आहे. अभिनयाशिवाय तिची यशस्वी उद्योजिका म्हणूनदेखील ओळख आहे. काही दिवसांपूर्वीच प्रदर्शित झालेल्या हुरून रिच लिस्टनुसार जुही चावला ही भारतातील सर्वांत श्रीमंत अभिनेत्री ठरल्याचे पाहायला मिळाले.**




जगभरातील टॉप १० श्रीमंत कलाकारांमध्ये ज्या अभिनेत्रीचे नाव आहे, ती जुही चावला आहे. 'हुरून रिच लिस्ट'नुसार जुहीची ४,६०० कोटी रुपयांची संपत्ती आहे, जी ऐश्वर्या राय बच्चन, प्रियांका चोप्रा, आलिया भट्ट, दीपिका पदुकोण या लोकप्रिय अभिनेत्रींपेक्षा अनेक पटींनी जास्त आहे. २००९ पासून जुही चावलाचा एकही चित्रपट बॉक्स ऑफिसवर हिट ठरलेला नाही. २००० पासून अभिनेत्रीने चित्रपटात काम करणे कमी केले असले तरी तिने उद्योग-व्यवसायात स्वतःची ओळख निर्माण केली आहे. ती आयपीएलमधील कोलकाता नाइट रायडर्स या टीमची आणि रेड चिलीज या ग्रुपची पती जय मेहता आणि अभिनेता शाहरुख खानबरोबर भागीदार आहे. मुलाखतीत जुही चावलाने तिच्या शाळेतील एक आठवण सांगताना म्हटले, की जेव्हा मी लहान होते, त्यावेळी आम्हाला विचारले गेले होते की, जेव्हा तुम्ही मोठे व्हाल, त्यावेळी तुम्हाला कोणत्या क्षेत्रात काम करायचे आहे? त्यावेळी चित्रपटांमुळे प्रसिद्धी मिळते हे माहीत होते. तर मी वहीत लिहिले, आनंदी, आरोग्यदायी, श्रीमंत आणि प्रसिद्ध व्हायचे आहे. हे जेव्हा माझ्या मित्रांनी बघितले तेव्हा त्यांनी मला खूप चिडवले. त्यांनी मला विचारले की, तू श्रीमंत आणि प्रसिद्ध कशी होणार? मला याबद्दल कोणतीही कल्पना नव्हती. मी तेव्हा सहावीत किंवा सातवीत असेन. पण बघा, मला ती संधी मिळाली. कॉलेजमधील एका साध्या फॅशन शोने मला मिस इंडियाच्या स्पर्धेपर्यंत नेऊन पोहचवले. माझ्या पालकांसाठीदेखील तो धक्का होता. मिस इंडिया स्पर्धेत जुही चावला सहज सहभागी झाली होती. मात्र त्या स्पर्धेची ती विजेती ठरली आणि तिला अभिनय व मॉडेलिंग क्षेत्रातही काम करण्याची संधी मिळाली. अभिनय क्षेत्रात पाऊल ठेवल्यानंतर जुही चावलाला कयामत से कयामत तक, हम है राही प्यार के, येस बॉस, बोल राधा बोल अशा चित्रपटांतून लोकप्रियता मिळाली. जुही चावला आणि शाहरुख खानने २००१ साली ड्रीम्ज अनलिमिटेड ही प्रॉडक्शन कंपनी सुरू केली होती. या प्रॉडक्शनअंतर्गत त्यांनी तीन चित्रपटदेखील प्रदर्शित केले; मात्र त्यांच्यातील मतभेदांमुळे ते वेगळे झाले. या सगळ्याबरोबर जुही चावला सौराष्ट्र सिमेंट लिमिटेड या कंपनीत भागीदार आहे. ही कंपनी तिचा पती जय मेहता यांची आहे. या जोडप्याचे दोन रेस्टॉरंट्सदेखील आहेत. जुही चावला तिच्या पतीबरोबर रिअल इस्टेटमध्येदेखील गुंतवणूक करीत असते. दरम्यान, अभिनेत्री मॅगी, पेप्सी, कुरकुरे, अशोक लोणचे, केशकिंग आयुर्वेदिक तेल, इमामी बोरोप्लस अशा अनेक उत्पादनांची ती ब्रॅण्ड ॲम्बेसॅडर आहे. त्याबरोबरच जुही चावला 'झलक दिख ला जा' या शोची परीक्षकदेखील होती.

## श्रुती हसन नाकारायची वडिलांची ओळख!

चित्रपटसृष्टीतील कलाकारांना जितकी प्रिसिद्धी मिळते, तितकीच प्रसिद्धी त्यांच्या मुलांनादेखील मिळताना दिसते. कलाकारांप्रमाणेच त्यांच्या मुलांचेदेखील चाहते असतात. आता अभिनेत्री श्रुती हासनने वडिलांना मिळत असलेल्या लोकप्रियतेच्या काळात लहानाचे मोठे होण्याचा अनुभव कसा होता, याबरोबरच कमल हासन तिचे वडील असल्याचे ती लपवत असे, ती असे का करत होती, याबाबत सांगितले आहे.

श्रुती हासनने एका मुलाखतीत वडिलांविषयी बोलताना म्हटले, की लोक सतत मला त्यांच्याबद्दल विचारत राहायचे. मला असे वाटायचे की मी श्रुती आहे. मला स्वतःची वेगळी ओळख हवी आहे. लोक माझ्याकडे बोट दाखवायचे आणि म्हणायचे ती कमलची मुलगी आहे. जर मला कोणी विचारले तर सांगायचे की मी डॉक्टर रामचंद्रन यांची मुलगी आहे आणि माझे नाव पूजा रामचंद्रन आहे. डॉक्टर रामचंद्रन आमचे डेन्टिस्ट होते आणि मी स्वतःचे पूजा असे नाव सांगत असे. वडिलांची प्रसिद्धी नाकारून चेन्नईमध्ये मोठे होणे किती अवघड होते, यावर बोलताना श्रुतीने म्हटले, की माझे वडील अभिनेते आहेत किंवा लोकप्रिय आहेत, ही फक्त इतकीच गोष्ट नव्हती. मला लहानपणापासून माहित आहे की आतापर्यंत मी जितक्या लोकांना भेटले आहे, त्या सगळ्यापासून ते वेगळे आहेत. मला दोन हट्टी लोकांनी वाढवले आहे. आई आणि वडिलांमध्ये मी आणि माझी बहीण अडकलेलो असायचो. जेव्हा माझे आई-वडील वेगळे झाले, तेव्हा मी मुंबईला शिफ्ट झाले. मी श्रुती असण्याचा कधीच आनंद घेऊ शकले नाही. जेव्हा माझ्या वडिलांचे सगळीकडे पोस्टर लावलेले असे, तेव्हा त्यांच्या लोकप्रियतेपासून वेगळे होणे अवघड होते. मात्र आज मला कमल हासनशिवाय श्रुतीची कल्पना सुद्धा करायची नाही, असे ती म्हणाली. श्रुती स्वतः नावाजलेली अभिनेत्री आहे. २००९ मध्ये तिने 'लक' या



चित्रपटातून पदार्पण केले होते. २०११ मध्ये तिने तेलुगु आणि तमिळ चित्रपटसृष्टीत पदार्पण केले होते. अभिनयाशिवाय श्रुती पार्श्वगायिकादेखील आहे. तिचा स्वतःचा म्युझिक बँडदेखील आहे. ती नुकतीच प्रशांत नील यांच्या 'सालार पार्ट १ : सीजफायर' मध्ये दिसली होती. आगामी काळात ती 'सालार पार्ट २' आणि रजनीकांत यांच्याबरोबर कूली चित्रपटात दिसणार आहे.

## अर्जुन कपूरची बहीण अंशुला आईबद्दल म्हणाली...

अंशुला कपूर ही बोनी कपूर व त्यांची पहिली पत्नी मोना कपूर यांची मुलगी आणि अर्जुन कपूरची बहीण आहे. ती अभिनेत्री नसली तरी फॅशनविश्वात सक्रिय आहे. ती जाहिराती करते, मॉडेलिंग करते. अंशुला खूप लहान असताना तिच्या आई-वडिलांचा घटस्फोट झाला. आता तिने घटस्फोटानंतर लोक तिच्या कुटुंबाबद्दल ज्या गोष्टी बोलत होते, त्याचा खुलासा केला आहे. बोनी व मोना यांचं लग्न १९८३ मध्ये झालं आणि १९९६ मध्ये त्यांनी घटस्फोट घेतला.

अंशुला कपूर तिचे वडील बोनी कपूर, काका अनिल कपूर आणि संजय कपूर यांच्या सान्निध्यात मोठी झाली. नंतर तिचा भाऊ अर्जुन कपूर आणि चुलत भावंडं सोनम, रिया आणि हर्षवर्धन यांनीही चित्रपटांमध्ये काम केलं. आता, तिच्या सावत्र बहिणी जान्हवी आणि खुशी कपूर अभिनेत्री आहेत. एका प्रसिद्ध कुटुंबात राहण्याचे फायदे आहेत. मात्र त्याचबरोबर अंशुलाला हेही समजलं की बाहेरच्या लोकांना तिच्या घरात काय चाललंय हे माहीत असतं. त्यामुळे जेव्हा तिचे आई-वडील मोना व बोनी कपूर वेगळे झाले तेव्हा हा विषय बाहेरच्या जगासाठी चर्चेचा होता. अंशुलालाही त्यावेळी लोकांनी तिच्या कुटुंबाबाबत केलेल्या टिप्पण्यांचा सामना करावा लागला. आई-वडिलांचा घटस्फोट झाल्यावर अंशुलासाठी आईच जग होती. घटस्फोटानंतर ती कशी मोठी झाली, याबाबत तिने मुलाखतीत सांगितलं. ती म्हणाली, की ९० च्या दशकात मी वाढले. माझे आई-वडील वेगळे झाल्यावर काय बोलावं हे कोणालाही कळत नव्हतं. लोक कौटुंबिक मूल्ये, माझे संगोपन या गोष्टींबद्दल बोलू लागले. माझ्यावर याचा परिणाम झाला आणि मी हे न्यू नॉर्मल काय आहे, ते समजून घेण्याचा प्रयत्न करत होते, असं अंशुलाने सांगितलं. कपूर कुटुंबात कशी वाढली, याबद्दल बोलताना अंशुला म्हणाली की त्यांचं एकत्र कुटुंब होतं आणि आजी घर चालवायची. अर्थात बाबा काम करत होते, आई काम करत होती, संजय काका काम करत होते. शेवटी जेव्हा आई त्या घरातून बाहेर पडली तेव्हा आईला कणखर बनून एकटीला सगळी जबाबदारी घ्यावी लागली, असं अंशुला म्हणाली. तिने तिच्या दिवंगत आईचं खूप कौतुक केलं. ती काळजी घेणारी, प्रेम करणारी, आमच्या सगळ्या समस्या सोडवणारी आणि कमावणारी होती. आमचे आई व बाबा तीच होती. आमची काळजी घ्यायला जणू तिला १० हात होते, असं अंशुला म्हणाली. मोना कपूर यांच्यापासून घटस्फोट घेतल्यावर बोनी यांनी अभिनेत्री श्रीदेवीशी लग्न केलं. त्यांना जान्हवी व खुशी या दोन मुली झाल्या. अंशुला व तिचा मोठा भाऊ अर्जुन कपूर दोघांच्या वयात सहा वर्षांचे अंतर असूनही आईने दोघांसाठी कधीही वेगळे नियम केले नाहीत, असं तिने सांगितलं. तिचा आमच्यावर विश्वास होता. जेव्हापर्यंत आम्ही घरी यायचो नाही, तेव्हापर्यंत ती कधीच झोपायची नाही. आम्हाला आमच्या सगळ्या प्लॅन्सबद्दल तिला सांगावं लागायचं. तो (अर्जुन) मुलगा आहे व मी मुलगी आहे म्हणून आमच्या जबाबदाऱ्या वेगळ्या नव्हत्या, असं अंशुला म्हणाली. अर्जुन पुरुष असल्याने नाही तर माझा मोठा भाऊ असल्याने त्याने काळजी घेणं अपेक्षित होतं, असंही अंशुलाने नमूद केलं. मोना कपूर यांचं २०१२ मध्ये निधन झालं.



## वजन कमी करण्याबद्दल हुमाला डेविड धवन यांनी दिला मोलाचा सल्ला

२०१२ मध्ये 'गँग्स ऑफ वासेपूर' चित्रपटातून बॉलीवूडमध्ये पदार्पण केलेल्या हुमा कुरेशीने आपल्या पहिल्याच चित्रपटात अविस्मरणीय अभिनय करत प्रेक्षकांच्या मनात विशेष स्थान मिळवलं. नुकतंच एका मुलाखतीत हुमा कुरेशीने 'गँग्स ऑफ वासेपूर' रिलीज झाल्यानंतरची एक आठवण सांगितली. तिच्या पहिल्या सिनेमानंतर प्रसिद्ध दिग्दर्शक डेव्हिड धवन यांच्याशी तिची अचानक भेट झाली होती. याच भेटीत डेव्हिड धवन यांनी हुमाला एक सल्ला दिला होता. मुलाखतीत हुमा म्हणाली, की 'गँग्स ऑफ वासेपूर' नंतर मी एका कॉफी शॉपमध्ये डेव्हिड धवन यांना भेटले. त्यांना समोर पाहून मला खूप आश्चर्य वाटलं. त्यांनी स्वतःहून माझ्याकडे येऊन मला एक सल्ला दिला होता. तो सल्ला माझ्यासाठी खूप महत्त्वाचा होता. हुमा पुढे म्हणाली, की त्यांनी मला म्हटलं, 'बेटा, तू खूप चांगली अभिनेत्री आहेस. तुला खूप लोक सांगतील वजन कमी कर, सर्जरी कर, पण असं काहीही करू नकोस. प्रेक्षकांनी तुला स्वीकारलं आहे, त्याचं महत्त्व समजून घे.



तुला फक्त प्रेक्षकांचं मनोरंजन करायचं आहे. हुमा या मुलाखतीत म्हणाली, की त्यांनी दिलेला सल्ला मला खूप भावला. सिनेसृष्टीतील ज्येष्ठांकडून मिळालेला असा सल्ला खूप मोलाचा असतो, असे हुमा म्हणाली. तो सल्ला मी लिहून ठेवला. हुमाने याच मुलाखतीत शरीराच्या नैसर्गिक रचनेबाबत तिचे विचार मांडले. ती म्हणाली, की आपल्या देशात प्रत्येकाला दुसऱ्याच्या सौंदर्याबद्दल आकर्षण असतं, स्वतःबद्दल अनेकांना समाधान नसतं. जर तुम्ही नाकाची सर्जरी करून त्याचा आकार सुधारणार असाल तर नाक सुधारताना तुमची हनुवटी बिघडू शकते. लोकांना त्यांच्या नैसर्गिक रुपात राहू द्या, असं हुमा म्हणाली.

## रकुल प्रीत सिंगने सांगितला तिचा डाएट प्लॅन

**बॉलीवूड अभिनेत्री रकुल प्रीत सिंग आपल्या अभिनयाबरोबरच फिटनेसमुळे चर्चेत असते. रकुल फिट राहण्यासाठी जिममध्ये व्यायाम करते, तसेच ती तिच्या आहाराकडे विशेष लक्ष देते. रकुल तिच्या आरोग्याची खूप काळजी घेते. आता एका मुलाखतीत तिने तिचा डाएट प्लॅन सांगितला आहे. दिवसभर ती काय खाते, तिच्या आहारात कोणत्या पदार्थांचा समावेश असतो, याची माहिती तिने दिली.**

सेलिब्रिटींची जीवनशैली खूपच शिस्तबद्ध असते. अनेक सेलिब्रिटी त्यांचे रोजचे रुटीन चाहत्यांबरोबर शेअर करत असतात. हेल्दी आणि संतुलित आहार घेण्याकडे त्यांचा कल असतो. रकुल प्रीतचंही फिट राहण्यासाठी एक रुटीन आहे जे ती फॉलो करते. रणवीर अलाहाबादियाला दिलेल्या मुलाखतीत तिने तिचा डाएट कसा असतो, ते सांगितलं. तिच्या दिवसाची सुरुवात कशी होते, ती दुपारच्या जेवणात काय खाते आणि रात्रीच्या जेवणाची वेळ काय असते, याबाबत तिने सांगितलं. रकुल प्रीत म्हणाली, की माझ्या दिवसाची सुरुवात गरम पाण्याने होते. त्यानंतर मी दालचिनीचे पाणी किंवा हळदीचे पाणी पिते. त्यानंतर मी भिजवलेले ५ बदाम, एक भिजवलेले अक्रोड खाते. त्यानंतर तूप कॉफी घेते. वर्कआउट केव्हा पूर्ण करते, त्यावर प्रोटीन स्मूदी घ्यायची की नाही हे ठरवत असल्याचं रकुलने सांगितलं. मी पोटभर नाश्ता करते. त्यात अंडी व पोहे किंवा कडधान्यांचे धिरडे याचा समावेश असतो, असं ती म्हणाली. रकुल दुपारच्या जेवणात काय खाते, याची माहिती तिने दिली. दुपारच्या जेवणात भात किंवा ज्वारीची



भाकरी, मासे किंवा चिकन प्रोटीन घेते. संध्याकाळी ४.३० ते पाच वाजेपर्यंत मी नाश्ता करते. नाश्त्यात चिया सीड्स पुडिंग, फळं आणि दही असतं किंवा मी शूटिंग करत असेल तर पीनट बटर टोस्ट आणि नट्स खाते, असं रकुल म्हणाली. रकुलने तिच्या रात्रीच्या जेवणाची वेळ सांगितली. रात्रीचे जेवण ७ वाजेपर्यंत करण्याचा प्रयत्न असतो. रात्रीच्या जेवणात भाजी व दुपारपेक्षा कमी कार्बोदकं असलेल्या पदार्थांचा समावेश करत असल्याचं रकुल म्हणाली.

# वाहून जाणारे पाणी वळवून पठार भागाला देणार

## ■ उपमुख्यमंत्री अजित पवार यांची ग्वाही ■ महायुतीचे उमेदवार काशिनाथ दाते यांच्या प्रचारार्थ सभा ■ अपक्ष उमेदवार विजय सदाशिव औटी यांचा दाते यांना पाठिंबा

भाळवणी : विशेष प्रतिनिधी

**कान्हूरपठार व पठार भागाचा १ टीएमसी पाण्याचा प्रश्न प्रलंबित असून तो दुर करण्यासाठी पश्चिमेकडचे समुद्राकडे वाहून जाणारे पाणी पुर्वेकडे वळवून नगर, मराठवाडयाच्या भागाला देण्याची योजना असून लवकरच हे काम केले जाईल अशी ग्वाही पवार यांनी दिली. यावेळी अपक्ष उमेदवार विजय सदाशिव औटी यांनी काशिनाथ दाते यांना पाठिंबा जाहिर केला.**

महायुतीचे उमेदवार काशिनाथ दाते यांच्या प्रचारार्थ भाळवणी येथे आयोजित करण्यात आलेल्या सभेमध्ये उपमुख्यमंत्री अजित पवार हे बोलत होते. यावेळी मा. खा. डॉ. सुजय विखे पाटील, उमेदवार काशिनाथ दाते, सुजित झावरे पाटील, विजय सदाशिव औटी, संध्या सोनवणे, प्रशांत गायकवाड, अशोक सावंत, विश्वनाथ कोरडे, मधुकर उचाळे, राहुल शिंदे पाटील, गणेश शेळके, विक्रमसिंह कळमकर, सचिन वराळ, वसंत चेडे, सुनील थोरात, अश्विनी थोरात, दत्ता पवार, संदीप ठुबे यांच्यासह महायुतीमधील घटक पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, विविध गावांचे नागरीक उपस्थित होते.

यावेळी बोलताना अजित पवार म्हणाले, नगरमध्ये आल्यावर आजोळी आल्यासारखे वाटते. जिल्हयाची राजकीय पार्श्वभुमी मला माहिती आहे. पारनेर तालुक्यातील अनेक मान्यवरांनी उमेदवारीसाठी इच्छा प्रदर्शित केली होती. सर्वच ताकदीचे होते. उमेदवारी मात्र एकालाच देता आली. पूर्वीच्या निवडणूकीत श्रीगोंद्यात बबनराव पाचपुतेंच्या विरोधात सर्वांना एकत्र करून उमेदवार देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. उमेदवारीसाठी उत्सुक असलेल्यांचा सन्मान करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यावेळी राहुल जगताप यांना विजयी केले आणि इतरांना इतर संधी दिल्या, त्याच पध्दतीने पारनेरमध्येही इतर इच्छुकांना संधी देण्यात येणार असल्याचे पवार म्हणाले.

दाते यांनी यापूर्वीही उमेदवारी मागितली होती. मिळून मिसळून वागणारे व्यक्तिमत्व. या पदावर जाऊन काम करण्याची त्यांची संधी होती. त्यामुळे महायुतीची उमेदवारी त्यांना देण्यात आली तर इतरांना वेगळी संधी देऊन पुनर्वसन करण्याचा आपण शब्द दिल्याचे पवार म्हणाले.



■ महायुतीचे उमेदवार काशिनाथ दाते यांच्या प्रचारार्थ उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भाळवणी येथे सभा झाली.

### ही निवडणूक आपल्या सर्वांची

चाळीस वर्षापासून जो माणूस कष्ट करतोया त्यांना न्याय देण्याची भुमीका घेऊ. ही निवडणूक आपल्या सर्वांनी झाली आहे. माझ्या बरोबरच्या युवकांचा रोजगाराचा, माता भगिनींच्या डोक्यावरचा हंडा उतरविण्याचा माझा प्रयत्न आहे. अजित पवार, सुजय विखे हे पारनेर-नगर मतदार संघाचा पाणी प्रश्न सोडवितील. दोन दिवसांत होणाऱ्या मतदानात माझ्या बरोबरचे सहकारी जी काही ताकद लागेल ती ताकद लावणार आहोत. माझ्या युवकांना वाऱ्यावर सोडू नका. सुजय विखे यांच्या नेतृत्वाखाली आम्ही येथे आलो आहोत. मतमोजणीनंतर आपल्याला पुन्हा लोकसभेची तयारी सुरू करायची आहे.

विजय सदाशिव औटी

### औटी यांचा मी आभारी आहे

तिघांनी उमेदवारीची मागणी केली होती, त्यासाठी स्पर्धा झाली. अखेर माझ्या उमेदवारीवर शिक्कामोर्तब झाले. सुजित पाटलांनी अर्ज मागे घेतला. विजय सदाशिव औटी यांचीही मानसिकता होती. मात्र कार्यकत्यांचा आग्रह होता. त्यांच्या आग्रहाखातर त्यांनी उमेदवारी ठेवली. आज कोणत्याही अमिषाची वाट न पाहता सुजय विखे यांच्या मध्यस्तीने त्यांनी पाठिंबा देण्याचा निर्णय घेतल्याबद्दल मी त्यांचा मनपापसून आभारी आहे.

काशिनाथ दाते
महायुतीचे उमेदवार

### कार्यकर्त्यांना वाऱ्यावर सोडणार नाही

सुजित पाटलांनी मोठया मनाने माघार घेत ते प्रचारात सक्रिय झाले. स्व. वसंतराव झावरे यांना मानणारे कार्यकर्ते यावेळी उपस्थित आहेत. एकाही कार्यकर्त्याला मी वाऱ्यावर सोडणार नाही. ज्या निष्ठेने विजय सदाशिव औटी यांचे ते काम त्यांचे सहकारी करतात त्याच निष्ठेने मी त्यांना न्याय देईल. आमचा एकच उद्देश आहे तो म्हणजे विरोधी उमेदवाराचा पराभव करायचा. त्यासाठी विजय औटी यांनी सुज्ञ निर्णय घेतला. मी आमदार म्हणजे विजय औटी,सुजित पाटील आमदार त्यात कुठलीही कसर ठेवणार नाही अशी ग्वाही दाते यांनी दिली.

### दाते यांना तरी वाचवा !

तुम्ही माझा कार्यक्रम लावला आता काशिनाथ दाते यांना तरी वाचवा. संगमनेरला माझे भाषण कळाले पारनेरला कसे कळाले नाही ? तुमच्या मुलांचे भविष्य तुमच्या हातात आहे. विजूने ते धाडस केले विजय आणि त्याच्या प्रत्येक युवकामागे सुजय विखे शेवटच्या श्वासापर्यंत खंबीरपणे उभा आहे. विजयच्या पाठीशी युवक खंबिरपणे उभे राहिले. आमचे आयुष्य गेले विजयने दोन वर्षात मोठे संघटन उभे केले. मनाचा मोठेपणा दाखविला. पॅकेज घेउन उभे आहेत त्यांनी मनाचा मोठेपणा दाखवून व्यासपीठावर यावे. हीच वज्रमुठ अशीच बांधली असती तर मी आजी राहून आज भाषण केले असते असेही खा. विखे म्हणाले.

### २ कोटी ३० लाख बहिणींना पैसे

आम्ही भगिनींना २ कोटी ३० लाख महिलांना लाडकी बहिण योजनेतून पैसे पाठविले. विरोधकांनी राज्याला कंगाल केल्याची टीका केल्याचे पवार म्हणाले.

### सिंचन योजना सोलरवर करणारे

कॅबिनेटमध्ये ८५ हजार कोटी रूपयांचे प्रकल्प मंजुर केले. उपसा सिंचन योजना मंजुर केल्या. सिंचन योजना सोलरवर करण्यात येत आहे. यापुढील काळत शेतकऱ्यांना दिवसा वीज देण्यात येणार आहे. बिहार आंध्रपदेशप्रमाणे महाराष्ट्राला अधिकचे देण्याचा प्रयत्न असल्याचे पवार यांनी सांगितले.

### राज्यात पुन्हा महायुती

राज्यात १७५ जागा घेऊन महायुतीचे सरकार येणार आहे. पाच वर्षे आम्हीच आहोत. एक एक आमदार महत्वाचा आहे. दाते अनेक वर्षे थांबले आहेत, आता संधी आलेली आहे. तुमच्या घरातील माणूस पारनेरचे प्रतिनिधित्व करायला निघाला आहे. तुम्हीच उमेदवार म्हणून काम करायचे आहे. ज्यांना उमेदवारी मिळाली नाही, जे लोक थांबले त्यांनी नाराज होऊ नये त्यांचे पुनर्वसन करण्याची ग्वाही पवार यांनी दिली.

### कारभार कसा करता याला महत्व

मी १९९१ मध्ये बारामतीचा खासदार झालो. त्यानंतर लगेच आमदार झालो. राज्यमंत्री झालो. मी माझ्या भागातील संस्था चांगल्या चालवितो. उसाला, दुधाला चांगला भाव देतो. खरेदी विक्री संघाच्या माध्यमातून योग्य दरात खते बियाणे उपलब्ध करून देतो. बाजार समितीमध्ये शेतमालास योग्य भाव देतो. जिल्हा बँकही उत्तम आहे. पतसंस्थांची अवस्था तुम्हाला माहीती आहे. आपल्या संस्था कशा चालल्या , कारभार कसा चालतो याला महत्व असल्याचे पवार म्हणाले.

### तालुक्याला १२६ कोटींचे अनुदान

एमआयडीसीमध्ये किती रोजगार आले. तिथे कुणाची दादागिरी आहे. याचा विचार करा. लाडकी बहिण, तीन सिलेंडर, मुलींचे मोफत शिक्षण १८ वर्षानंतर १ लाख रूपये, शेतकऱ्यांचे वीज बिल माफ करण्यात आले असून मागील बिलही जमा करून घेतले आहे. १ रूपयामध्ये पीक विमा दिला. दुधाला सात रूपये अनुदान दिले. सोयाबिनला हेक्टरी ५ हजार अनुदान दिले. आताही भाव पडले. त्यासाठी कृषि मंत्र्यांशी बोलणे झाले असून आचारसंहितेनंतर त्यातून मार्ग काढण्यात येईल. पारनेर तालुक्यात अतिवृष्टीने झालेल्या नुकसानीमुळे १२६ कोटी रूपये अनुदान देण्यात आले असल्याचे पवार म्हणाले.

### तुम्ही काय साधले ?

सुजय विखे यांना खासदारकीची उमेदवारी दिली होती, तुम्ही त्यांना पराभूत केले. तुम्ही काय साधले ? विजयी झालेले काय काम करणार ? त्यांच्या विचारांचे सरकार आहे का ? विखे यांना विजयी केले असते तर त्यांनी विविध योजना राबवून काम केले असते तुम्ही भावनेच्या आहारी जाउ निर्णय घेत असल्याचे पवारांनी सांगितले.

### बटण दाबण्यासाठी बहिण उत्सुक !

मी जनतेचा कल पाहिला. महिलांचा कल पाहिला. मोठया संख्येने महिला सभांना येत आहेत. महिलांमध्ये आनंद, समाधान आहे. लाडकी बहिण बटण दाबण्यासाठी उत्सुक झाली आहे. आपल्या भवितव्याच्या दृष्टीने ही निवडणूक महत्वाची आहे. शेतीच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न आहे. केंद्र सरकारच्या मोठया योजना सुरू आहेत. त्याचा फायदा आपण घेऊ असे पवार म्हणाले.

### आता तुमची जबाबदारी

आपला प्रतिनिधी स्वच्छ, सर्वांच्या प्रश्नांची जाण असणारा आहे. विधीमंडळात जाऊन काम करावे लागते. अधिकाऱ्यांना हाताशी धरून काम करून घेण्याची हातोटी लागते त्यात ते यशस्वी होतील यात शंका नाही. मी माझी जबाबदारी पार पाडली आहे. पारनेरकरांनी त्यांची जबाबदारी पार पाडायची आहे.

अजित पवार, उपमुख्यमंत्री

### वाद्याचा जाहिरनामा

दाते यांना निवडणून दिल्यानंतर आम्ही काय करणार ते सांगण्यासाठी आम्ही जाहिरनामा प्रसिध्द केला असून काय काम करणार याच उल्लेख त्यात आहे. आमचा काय वादा असेल ते या जाहिरनाम्यात सांगण्यात आले असल्याचे अजित पवार म्हणाले.

### तुम्ही निर्णय घ्यायचा आहे

पारनेर तालुक्याची शेवटची व सर्वसामान्यांची अस्तित्वाची निवडणूक आहे. आज चुक केली तर तुम्ही ग्रामपंचायतला उभे राहीले तरी तुम्हाला उचलून नेले जाईल.निर्णय तुम्हाला घ्यायचा आहे. डोंगरात, जंगलात रहायचे की आमच्या-तुमच्यात रहायचे याचा निर्णय तुम्ही घ्यायचा असल्याचे विखे म्हणाले.

### आम्ही आमच्या योजनांवर बोलतो

चारसो पार झाल्यानंतर हिंदू राष्ट्र करणार, मुस्लिम समाजाला देशातून बाहेर काढणार असा प्रचार करण्यात आला. आमचे काम बोलते. आम्ही विरोधकांवर बोलत नाही. आम्ही दिलेल्या योजना आम्ही सांगतो. असे पवार म्हणाले.

### शेवटच्या टप्प्यात माघार ही मोठी गोष्ट

विजय औटी यांचे आभार मानतो. शेवटच्या टप्प्यात माघार घेणे ही मोठी गोष्ट आहे. त्याला मोठे मन लागते. संयम लागतो. विजय औटी सारखा मुलगा सर्वसामान्यांना बरोबर घेऊन प्रचारात आघाडी घेतो. हे महत्वाचे आहे. विजयला उमेदवारी देण्यात मी अपयशी झालो. निवडणूकीच्या शेवटच्या टप्प्यात पोचलेलो असताना आम्ही सर्व एकत्र आलो, त्यात त्यांचा कोणताही स्वार्थ नसल्याचे डॉ. विखे म्हणाले.

### माझे काय नुकसान झाले ?

या तालुक्याला दडपशाहीमुक्त करण्याठी आपण एकत्र आलो आहोत. लोकसभेलाही मी सर्वांना हेच सांगत होतो मात्र माझे कोणी ऐकले नाही. मी पराभूत झाले माझे काय नुकसान झाले? सर्वसामान्य माणसाला होणारा त्रास दुर करण्यासाठी माझा प्रयत्न होता. तेच सांगण्यासाठी मी पुन्हा आलो आहे. या जिल्हयाची युवा पिढी पाच वर्षे मागे गेली. जे युवक चांगल्या मार्गाने न्यायचे होते ते मटका जुगाराच्या मागे असल्याची टीका विखे यांनी केली.

### निघोजमध्ये उचाळे प्रचाराची धुरा सांभाळत आहेत

मधुकर उचाळे यांनी कधीही कोणाचाही जाहिर प्रचार केला नाही. त्यांनी यावेळी स्वतः निवडणूकीत उतरून प्रचार सुरू केला आहे. निघोज गटात ते प्रचाराची धुरा सांभाळत असल्याचे दाते म्हणाले.

### अजितदादांनी टाकलेल्या विश्वासास पात्र राहील

पठार भागाच्या पाण्याबाबत अजित पवार यांनी शब्द दिला आहे. तालुक्यातील प्रलंबित प्रश्नासाठी मी माझी संपूर्ण ताकद लाविल.अजित पवार यांनी टाकलेल्या विश्वासास पात्र मी पात्र राहील.

काशिनाथ दाते

### मी शब्दाचा पक्का

मी शब्दाचा पक्का आहे. पडेल ती किंमत मोजावी लागली तर मी तो शब्द पुर्ण करतो. लोकसभेच्या निकालामध्ये आम्हाला फटका बसला. अनेक उमेदवार पडले. त्या खोलात आम्ही गेलो. कांदा निर्यात बंदीचा निर्णय. केंद्राने तो निर्णय केल्याने लोकांमध्ये नाराजी दिसून आली. कांदा उत्पादक शेतकरी विविध भागात आहे. केंद्र सरकारशी चर्चा केली. ७ टक्के मते आम्हाला कमी पडली. आम्ही आता कांदा निर्यात बंदी उठविली आहे. कांद्याला चांगला दर मिळतो आहे. महत्वाची कामे आम्ही माग लावली असल्याचे पवार यांनी सांगितले.

### तर दाते आमदार झाल्याशिवाय राहणार नाहीत

विजय औटी यांच्या पाठींब्यामुळे वातावरण बदलले असून राजकीय गणितेही बदलली आहेत. व्यासपीठावर व मांडत आहेत ते पुरेसे आहेत. प्रत्येकाने प्रामाणिक काम केले तर काशिनाथ दाते आमदार झाल्याशिवाय राहणार नाहीत असा विश्वास मा. खा. डॉ. सुजय विखे यांनी व्यक्त केला.

### विरोधक नरेटीव्ह पसरवत आहेत

संविधान बदलण्यासंर्भात कोणीतरी मागासवर्गीयांमध्ये फेक नरेटीव्ह उपस्थित केला. चारसो पार कशासाठी हवे ? आरक्षण काढायचे आहे. असा प्रचार करण्यात आला. याच काँग्रेसने बाबासाहेब आंबेडकर यांना दोनदा पराभूत केले. दुसरीकडे ते आता नरेटीव्ह परसवत आहेत. आम्ही सर्व जिल्हयात संविधान भवन उभारणार आहोत. तालुक्यातही उभारण्याचे नियोजन आहे. कुठेही संविधान बदलण्याचा प्रश्न नाही. गैरसमज कोणी करून घेऊ नये.

### आमचे घर का मान्य नव्हते ?

सामान्य-श्रीमंत असा प्रचार लोकसभेत प्रचार झाला. आज काय झाले ? एकाच घरात आमदार-खासदार हे मान्य आहे का ? असे असेल तर आमचे घर का मान्य नव्हते, याचे उत्तर द्या. निवडणूक आपल्या बाजूने आहे, लाडक्या बहिणी आपल्या बाजूने आहेत. युवक आपल्या पाठीशी आहे. तिन पिढयाचा पारनेर तालुका पुढे बसला आहे. या वज्रमुठीच्या माध्यमातून दडपशाही मुक्त पारनेरसाठी आपण एकत्र आलो आहोत हे दाखवून द्यायचे आहे. या तालुक्याच्या निर्णयावर संपूर्ण महाराष्ट्राला विश्वास आहे.

# उगवत्याच्या मागे या, मावळत्यांच्या नादी लागू नका !

## खा. नीलेश लंके यांचे विरोधकांवर शरसंधान । अळकुटी येथे प्रचार सभा

अळकुटी : प्रतिनिधी

**विधानसभा निवडणूक सुरू झाल्यानंतर काही उमेदवार मतदारांपुढे येत आहेत. हे उमेदवार भुछत्रासारखे आहेत. निवडणूकीनंतर ते पुन्हा मावळणार आहेत. ते परत येणार नाहीत. मी उगवता सुर्य आहे. उगवत्या सुर्याच्या मागे या, मावळत्यांच्या नादी लागू नका.**

महाविकास आघाडीच्या उमेदवार राणी लंके यांच्या प्रचारार्थ अळकुटी गणाच्या वतीने अळकुटी येथे रविवारी प्रचार सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र फाळके, महानगर बँक व जिल्हा बँकेच्या संचालक गीतांजली शेळके, गितांजली शेळके, बहुजन रयत परिषदेच्या अध्यक्षा ॲड. कोमल साळुंके, राष्ट्रवादीचे जिल्हा उपाध्यक्ष प्रा. सिताराम काकडे, डॉ. भास्कर शिरोळे, शिवसेना महिला आघाडीच्या तालुकाध्यक्ष प्रियंका खिलारी, बाबाजी भंडारी, कुंदनमल साखला, बाळासाहेब पुंडे, सखाराम उजघरे, संतोष काटे, किरण डेरे, सुवर्णा धाडगे, गुंडा भोसले, अनिल आवारी, धोंडीभाउ झिंजाड, किरण पानमंद, श्रीकांत डेरे, निवृत्ती गाडगे यांच्यासह अळकुटी गणातील असंख्य नागरीक यावेळी उपस्थित होते.

यावेळी बोलताना खा. लंके म्हणाले, निवडणूकीमध्ये सर्व कार्यकर्त्यांची प्रचाराची धुरा अतिशय समर्थपणे जबाबदारीने पार पाडली. दोन दिवस राहीले आहेत. आपणच उमेदवार म्हणून काम करा. मागील पाच वर्षात किमान दोन हजार कोटी रूपयांचा निधी आपण आणला. काही कामे प्रलंबित आहेत. ती कामे माग लावण्यात येतील. म्हस्केवाडी रस्त्याचे काम प्रलंबित आहे. पहिल्याच टप्प्यात हे काम माग लावले जाईल. गोसावी माता सभामंडपासाठी पाडळीआळेच्या नागरीकांनी मागणी केली आहे, त्यांच्या अपेक्षापेक्षाही अधिक चांगला सभामंडप देऊ, तुम्ही तो पाहत राहाल. पाडळीआळे येथील मोरया गृपने राष्ट्रवादीत प्रवेश केला त्यांचे पक्षात स्वागत करतो. रेनवडी, रांधे, दरोडी, वडनेरचे एकही काम मागे ठेवणार नाही शिरापुरचेही एकही काम मागे ठेवणार नाही. सर्वच गावांमधील कामे माग लावली जातील कोणीही काळजी करू नये. कळस गावाने एकमुखी निर्णय घेत विरोधी उमेदवाराचे बुथ न लावण्याचा निर्णय घेतला आहे, त्यामुळे तेथील विकास कामांकडेही लक्ष द्यावे लागेल असे खा. लंके यांनी सांगितले.




महाविकास आघाडीच्या उमेदवार राणी लंके यांच्या प्रचारार्थ अळकुटी येथे प्रचार सभेचे आयोजन करण्यात आले होते.

### दिलेल्या संधीचे सोने केले

तुम्ही निश्चितपणे चांगले प्रेम केले. पाच वर्षापूव तुम्ही मला संधी दिली, त्या संधीचे मी सोने केले. लोकसभा निवडणूकीतही तुम्ही तालुक्याची अस्मिता दाखविण्याचे काम केले. मला लोकसभेत जाण्याची संधी मिळाल्याचे खा. लंके म्हणाले.

### निवडणूकीनंतर एक खिडकी योजना

निवडणूकीनंतर आपण मतदारसंघात एक खिडकी योजना राबविणार आहोत. जसे कोणताही आजार असेल तर त्यावर एकच डॉक्टर उपचार करू शकतो. कोणतेही काम असेल तर एकाच खिडकीत जायचे. सतरा दरवाजे फिरण्यापेक्षा एका दारात गेलेले कधीही चांगले. सगळ्या अडचणी एकाच माणसाकडून दुर होणार आहेत. इतरांच्या नादी लागू नका. जास्तीत जास्त मताधिक्य कसे मिळेल यासाठी प्रयत्न करा. इकडे तिकडे लक्ष विचलीत होउ देउ नका. दोन दिवस राहीले आहेत. तुम्ही तुमचे गाव सांभाळा. आपल्या गावात जास्तीत जास्त मताधिक्य कसे मिळेल त्यासाठी प्रयत्न करा.

खा. नीलेश लंके

### पिटीशन दाखल केले तरी पाच वर्षे मीच खासदार !

कॅमेरा बंद केल्याबाबत बंडू शिरोळे यांनी माहीती दिल्यानंतर त्यांच्या नादी लागू नका. लोकसभेच्या निवडणूकीनंतर कोर्टात हेलपाटे मारावे लागले. या निवडणूकीच्या अनुषंगाने समोरच्या गडयाने तेराशे पानांचे पिटीशन दाखल केले आहे. कितीही पिटीशन दाखल केले तरी काही होणार नाही. पाच वर्षासाठी मीच खासदार असणार आहे. त्यामुळे कॅमेरा बंद केला तरी तिकडे दुर्लक्ष करण्यासाठी मी सांगितले कारण कोर्ट कचेरीची आपल्याला माहीती नाही.

खा. नीलेश लंके
लोकसभा सदस्य

### गीतांजली ताईचा उत्साह वाढला

गेली पंधरा वीस दिवस सर्व जण प्रचाराच्या धावपळीत आहेत. जीएस महानगर बँकेच्या संचालक गीतांजली शेळके या ज्यावेळी वेळ मिळेल त्यावेळी मतदारसंघात येतात. उन्हाची पर्वा न करता प्रचारात सहभागी होतात. आता महिला राज असल्याने गीतांजलीताई यांचा उत्साह अधिक वाढला असल्याचे खा. नीलेश लंके म्हणाले.

### महिलांनीच ही निवडणूक हाती घेतली

या निवडणूकीत मला जाणवले की उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठीही २५ ते ३० हजार महिलांनी हजेरी लावली होती. प्रचारातही महिला दिसत असून या निवडणूकीत पुरूषांचा ताण बराच कमी झाला. कोणत्याही व्यासपीठावर गेले की तिथे महिलांनी ताबा घेतल्याचे चित्र संपूर्ण निवडणूकीदरम्यान पहावयास मिळाले. महिलांनी निवडणूक हाती घेतल्यावर काय होते हे सर्वांना माहीती आहे. उमेदवार विजयी होणार ही काळ्या दगडावरची पांढरी रेघ आहे. राज्यातही महाविकास आघाडीचे सरकार सत्तेत येणार असल्याचा दावा खा. नीलेश लंके यांनी केला.

### खासदार आमदारापेक्षा मोठा !

सभेमध्ये शेवटचे भाषण करण्यासाठी खा.नीलेश लंके हे उभे राहिल्यानंतर उमेदवारालाही बोलायचे होते पण वेळ कमी असल्यामुळे मी उभा राहीलो, तसाही मी खासदार आहे ! असे त्यांनी सांगताच सभेत एकच हशा पिकला. कोणी म्हणायला नको की मी मोठा किंवा मी छोटा आहे ! खासदार आमदारापेक्षा मोठाच असतो! अशी मिश्किली करीत खा. लंके यांनी वातावरण हलके फुलके केले.

# कर्जुले हर्या गणात लंके यांना मताधिक्य मिळणार

## युवा नेते सचिन गोडसे यांना विश्वास



कर्जुले हर्या : प्रतिनिधी

**गणामध्ये पुणे आणि मुंबई स्थित पारनेरकरांची संख्या अधिक आहे. ते आपल्या मूळ गावी मतदार सुद्धा आहेत. या ठिकाणी खा.नीलेश लंके यांचा प्रभाव आहे. शिवसेना तालुकाप्रमुख असताना या ठिकाणी त्यांनी संघटनात्मक बांधणी केली. या सर्व पार्श्वभूमीवर येथे महाविकास आघाडीच्या उमेदवार राणीताई लंके यांना मताधिक्य मिळणार हे काळया दगडावरची पांढरी रेघ आहे. असा विश्वास धर्मवीर शंभूराजे प्रतिष्ठान अध्यक्ष तथा युवा नेते सचिन गोडसे यांनी व्यक्त केला.**

पारनेर नगर विधानसभा मतदारसंघात राणीताई लंके यांनी प्रचारामध्ये आघाडी घेतली आहे. त्यांना गावोगावी उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून ठिकठिकाणी स्वागत केले जात आहे. त्यातली त्यात पठार भागात प्रचंड मोठ्या प्रमाणात उत्साह दिसून येत आहेत. विशेष करून कर्जुले हर्या गणातील तेरा गावांमधील अनेक जण नोकरीवासानिमित्त मुंबई आणि पुणे या ठिकाणी स्थिरावले आहेत. विधायक बाब म्हणजे या सर्व कुटुंबाचा आपल्या मूळ गावी संपर्क आहे. त्यापैकी अनेक जण आपापल्या गावातील राजकारण व समाजकारणामध्ये सक्रिय आहेत. त्यापैकी काहीजण ग्रामपंचायत सदस्य सरपंच आणि उपसरपंच सुद्धा आहेत. परिणामी हा जरी ग्रामीण भाग असला तरी त्यावर शहरी मतदारांचा प्रभाव आहे.

मुंबईत राहणाऱ्यांपैकी बहुतांशी जण शिवसैनिक आहेत. हिंदुहृदय सम्राट स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांवर अनेक जण प्रभावित होऊन सुरवातीपासून या पक्षाचे काम करतात. दरम्यान खासदार नीलेश लंके शिवसेनेत असताना ते तालुकाप्रमुख पदावर कार्यरत होते. त्यांनी पठार भागातील शिवसैनिकांना संघटित करीत वज्रमुठ बांधली. पाच वर्षांपूर्वी त्यांनी विधानसभा निवडणूक घड्याळ चिन्हावर लढवली त्यावेळी सुद्धा कर्जुले हर्या आणि परिसरातील गावांमधून मताधिक्य मिळाले. काही महिन्यांपूर्वी पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीतही खासदार लंके यांना या भागातील लोकांनी खऱ्या अर्थाने पाठबळ दिले. आता तुतारी या चिन्हावर राणीताई लंके या निवडणुकीला सामोरे जात आहेत. महाविकास आघाडीचे सर्व घटक पक्ष त्यांच्या प्रचारात सक्रिय झाले आहेत. दरम्यान खा. लंके यांनी केलेले काम आणि राणीताई लंके यांच्या रूपाने पहिल्या महिला आमदार विधानसभेत जाव्यात अशी धारणा येथील लोकांची झालेली असल्याचे मत युवा नेते सचिन गोडसे यांनी व्यक्त केले.

अडीच वर्षांपूर्वी उद्धव बाळासाहेब ठाकरे यांना मुख्यमंत्री पदावरून पाय उतार व्हावे लागले. भारतीय जनता पक्षाने शिवसेना फोडून एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्री केले. शिवसेनाप्रमुखांनी स्थापन केलेला पक्ष आणि धनुष्यबाण हे चिन्ह हिरावून घेण्यात आले. ही गोष्ट सर्वसामान्य शिवसैनिक आणि नागरिकांना पटलेली नाही. त्याला कर्जुले हर्या गणातील शिवसैनिक आणि मतदार सुद्धा अपवाद नाहीत. आपला स्वाभिमान जपण्यासाठी आणि फोडाफोडीच्या राजकारणाला धडा शिकवण्यासाठी त्याचबरोबर उद्धव ठाकरे यांच्यावर झालेल्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी आमच्या गणातील मतदार नक्कीच तुतारी वाजवतील असा विश्वास गोडसे यांनी व्यक्त केला आहे.

### पारनेरला पहिल्या महिला आमदार मिळणार

राणीताई लंके या सातत्याने लोकनेते नीलेश लंके यांच्या सावली बनून राहिलेल्या आहेत. पंचायत समिती जिल्हा परिषदेमध्ये गेल्या बारा वर्षांमध्ये त्यांनी छाप पाडली. सामाजिक आणि राजकीय क्षेत्रांमध्ये त्या सक्रिय आहेत. जनसामान्यांचे दुःख ,अडचणी आणि प्रश्नांची राणीताई यांना उत्तम जाण आहे. महिला सबलीकरण आणि सक्षमीकरणासाठी त्यांनी सातत्याने पुढाकार घेतला आहे. त्यांच्या रूपाने पारनेर नगरला महिला आमदार मिळणार असल्याने एक भाऊ म्हणून माझ्या दृष्टिकोनातून तो सर्वाधिक आनंदाचा क्षण असेल. त्यांच्या विजयामध्ये खारीचा वाटा उचलण्यासाठी आम्ही सर्वजण सक्रिय झालो आहोत.

सचिन गोडसे
युवा नेते, कर्जुले हर्या गण

# जामगावच्या सरपंच माळी यांचा लंके यांना पाठिंबा

## महिला उमेदवाराला महिला पदाधिकाऱ्यांची साथ

जामगाव : प्रतिनिधी

**तालुक्यातील जामगाव येथील सरपंच पुष्पाताई बाळासाहेब माळी यांनी राजकीय जोडे बाजूला ठेवत महाविकास आघाडीच्या महिला उमेदवार राणीताई लंके यांना पाठिंबा देण्याचा निर्णय आज जाहीर केला. पारनेर तालुक्यात प्रथमच महिला उमेदवार विधानसभेची निवडणूक लढवीत असल्याने त्यांना साथ देण्यासाठी आपण हा निर्णय घेतल्याचे माळी यांनी सांगितले. त्यांच्या या निर्णयाचे उमेदवार लंके यांच्या बरोबरच पारनेर पंचायत समितीच्या मा. उपसभापती सुनंदाताई धुरपते यांनी स्वागत केले आहे.**

विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी अंतिम टप्प्यात आली आहे.प्रचाराच्या तोफाही आज थंडावल्या आहेत अशातच मनसेचे तालुकाप्रमुख बाळासाहेब माळी यांच्या पत्नी जामगावच्या विद्यमान सरपंच पुष्पाताई माळी यांनी




महाविकास आघाडीच्या उमेदवार राणीताई लंके यांना पाठिंबा देण्याचे जाहीर केले आहे. जामगाव येथील सरपंच व उपसरपंच या दोन्ही पदाधिकारी महिला असून यामुळेच विधानसभा निवडणूकीतील महिला उमेदवाराला आम्ही बिनशर्त पाठिंबा देत असल्याचे त्यांनी जाहीर केले.या निवडणुकीत राणी लंके यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहणार असल्याचा निर्धारही त्यांनी यावेळी बोलताना व्यक्त केला.

यावेळी उद्योजक सुरेश धुरपते, युवराज माळी , तंटामुक्त समितीचे अध्यक्ष अशोक मेहेर , सैनिक बँकेचे संचालक बाळासाहेब हिलाळ ,चेअरमन नवनाथ बांगर,उपसरपंच शितल भुजबळ,व्हाईस चेअरमन विष्णू नाईक , पप्पूशेठ बांगर ,माजी सरपंच अरुणा खाडे,मुकुंदा शिंदे, सामाजिक कार्यकर्ते जगन्नाथ भुजबळ,बाबाजी बांगर, रावसाहेब सोबले, राजेंद्र नाईक, दत्तात्रेय शिंदे, आनंदा भुजबळ, सागर बर्वे , प्रसाद मेहेर,बबन मेहेर , दादा शिंदे, गणेश बर्वे , बाजीराव बांगर,संजय शिंदे, आनंदा चौधरी ,सुधाकर शिंदे , दिलीप सोबले ,भाऊसाहेब शिंदे, बबलू शिंदे ,दिलीप बर्वे , जालिंदर खाडे , जालिंदर शिंदे, प्रल्हाद शिंदे,कुंडलिक बर्वे ,अतुल पवार,सुनिता नाईक, लिलाबाई भुजबळ, सुनिता शिंदे, बापू नाईक, संपत बर्वे,वजीर मण्यार, सतीश मेहेर,ज्ञानदेव घावटे,सागर चौधरी आदी उपस्थित होते.

# आ.संग्राम जगताप मांडले विकासाचे व्हिजन!

## शहराचा चेहरा मोहरा बदलून मेट्रो सिटीकडे वाटचाल होणार । आ.संग्राम जगताप यांचा विश्वास

नगर : प्रतिनिधी

**शहराचा आमदार या नात्याने आ.संग्राम जगताप यांनी गेल्या १० वर्षात शहरात केलेल्या विकास कामांचे प्रगती पुस्तक दाखवून येणाऱ्या ५ वर्षाचे शहर विकासाचे 'व्हिजन २९' मांडले. विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराच्या अंतिम टप्यात महायुतीचे उमेदवार आ.संग्राम जगताप यांनी सहकार सभागृहात झालेल्या कार्यक्रमात शहरातील विविध क्षेत्रातील तज्ञ व मान्यवरांच्या उपस्थितीत शहराचा भूतकाळ व बदलते भविष्य नगरकरांसमोर सचित्र मांडले.**

आ.जगतापांचे विकसित नगरचे सादरीकरण उपस्थितांना भावले. या उपक्रमाचे टाळ्यांच्या गजरात सर्वांनी कौतुक केले. शहरासाठी काय केले व पुढील पाच वर्षात काय करणार हे सांगणारे ते पहिलेच आमदार ठरले.बऱ्याच वर्षांनंतर नगर शहराला संग्राम जगताप यांच्या रूपाने शहराला सत्ताधारी आमदार लाभले. त्यामुळे राज्य सरकारकडून शहराच्या विकासासाठी मोठा निधी प्राप्त करण्यात आ.जगतापांना मोठे यश आले आहे. त्यामुळेच शहरात कोट्यावधी रुपयांच्या निधीतून सर्व भागांमध्ये मोठ्या प्रमाणात विकास कामे झाली आहेत.

यावेळी कार्यक्रमाच्या पूर्वार्धात आ.संग्राम जगताप यांनी गेल्या ५ वर्षात केलेल्या शहर विकास कामांची सविस्तर सचित्र माहिती मांडली. पूर्वाधात भविष्यातील विकासाचे व्हिजन २०२९' त्यांनी मांडताना सांगितले की, शहराच्या सर्वांगीण विकासासाठी पुढील काळातही याच पद्धतीने कटिबद्ध राहून नागरिकांना चांगल्या अद्यावत सोयीसुविधा देण्याचे नियोजन केले आहे. शहराचा चेहरा-मोहरा बदलवून शहराची वाटचाल मेट्रो सिटी करण्याच्या दिशेने करण्यासाठी 'व्हिजन २०२९' हे दमदार पाऊल ठरणार आहे. यामध्ये मुबलक व नियमित पाणी पुरवठ्यासाठी फेज ३ पाणी योजना या ८५० कोटींच्या योजनेला तत्वतः मान्यता याचा समावेश आहे. शहरातील महानगरपालिकेच्या शाळांमधूनही विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी डिजिटल व वातानुकूलित शाळा करणे. शहरातील गंजबाजार येथील भाजी मार्केटची अद्यावत इमारत उभारून नवनिर्मिती. आबाल वृद्धांसाठी शहराच्या विविध भागांमध्ये निसर्ग संपन्न उद्यानांचा विकास, सीना नदी परिसराचा कायापालट करत ऑक्सिजन पार्कची निर्मिती. शहर व उपनगर मधील नागरिकांच्या सोयीसाठी प्रदूषण मुक्त ई बस सेवा सुरु करणार. शहरातील महिलांसाठी नामांकित गृहउद्योगांमार्फत रोजगार निर्मिती



करण्यात येणार आहे. बुरुडगाव व मुकुंदनगर भागांमध्ये ज्येष्ठ नागरिकांसाठी भवनांची उभारणी करण्यात येईल.

विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका उभारली जाणार आहे. पिंपळगाव माळवी येथील महानगरपालिकेच्या ६५० एकर जागेत थीम पार्कची निर्मिती होणार आहे. यामुळे शहरातील पर्यटनाला चालना मिळणार आहे .शहरातील वाहतुकीची कोंडी कमी होण्यासाठी डी.एस.पी. चौक, एमआयडीसी मधील सन फार्मा चौक आणि सह्याद्री चौक येथे दुपदरी उड्डाणपुलाची निर्मिती होणार आहे. त्यासाठी निधी देखील मंजूर झाला आहे. एम.आय.डी.सी.च्या विस्ताराच्या माध्यमातून नगर मधील युवकांना त्यांच्या हक्काचा रोजगार येथेच मिळणार आहे. यासोबतच सीना नदीच्या रुंदीकरण, खोलीकरणाचा आणि कायापालटाचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प देखील संग्राम जगताप यांनी यावेळी मांडला.

यावेळी गेल्या पाच वर्षात शहराच्या विकासासाठी केलेल्या विकास कामांचे प्रगती पुस्तक आ.संग्राम जगताप यांनी मांडले. ते म्हणाले, गेल्या ५ वर्षात रस्ते विकासाला गती देताना शहरातील मुख्य डीपी रस्त्यांची कामे मजबुतीकरण, डांबरीकरण आणि काँक्रीटीकरण करत पूर्णत्वाच्या टप्प्यावर आणली. तसेच शहराच्या विविध ४२ भागांमधील रस्त्यांच्या विकासासाठी ४०० कोटींची कामे लवकरच सुरू करण्यात येणार आहे. पिण्याच्या पाणी समस्येवर प्रभावी तोडगा काढण्यासाठी मुळा धरण ते विळद घाट ते वसंत टेकडी दरम्यान पाइपलाइन, पंपिंग स्टेशन आणि साठवण टाक्या करिता १३७ कोटींचा निधीसह पूर्णत्वाच्या मार्गावर आहे. शहर कचराकुंडीमुक्त करण्यासाठी घंटागाड्यांची उपक्रम सुरु केला. शहरातील मलनिस्सारण व्यवस्थेसाठी नवीन भुयारी गटार योजनाही मार्गी लावली. शहरातील प्रत्येकाला सवलतीच्या दरात आरोग्य सुविधा मिळावी म्हणून बुरूडगाव रोडवर मनपा माध्यमातून सुरू केलेले सुपरस्पेशालिटी हॉस्पीटलचे काम, सावेडीत सुरू केलेले अकोमोडेशन आणि रिझर्वेशन पॉलिसीमध्ये अद्ययावत हॉस्पीटलचे काम प्रगतीपथावर आहे.

चौकांचे सुशोभीकरण करताना महापुरूषांची स्मारके उभारणीस प्रारंभ केला. क्रीडांगण विकासाचा विषय हाती घेतला आणि वाडिया पार्क विकासासाठी १५ कोटींचे काम लवकरच सुरु होणार आहे तसेच केडगाव येथे नवीन स्पोर्टस् काम्प्लेक्सची निर्मिती करण्यात येणार आहे. माळीवाडा, बस स्थानक क्रमांक ३ (पुणे), ताराकपूर बसस्थानकांचे नूतनीकरणाचे काम सुरू आहे. जिल्हा ग्रंथालयाची नव्याने उभारणी करण्याचे नियोजन केले आहे. सावेडीत नाट्यगृहाची निर्मिती करण्याचे काम प्रगतीपथावर आहे. राज्य सरकारकडे पाठपुरावा करून विळद परिसरात शासनाकडून ६०० एकर जागा एमआयडीसी विकासासाठी हस्तांतरीत झाली आहे. यामुळे उद्योग विकासासोबत रोजगार निर्मिती मोठी मदत होणार आहे. विजेची बचत करणार्या सौरऊर्जा प्रकल्पाची निर्मिती करण्यात येते आहे. शहर विकासाची ही कामे शहराच्या विकासाची पायाभरणीच ठरली आहेत.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com